## नियमित दिवाणी दावा क्र. ८२/२०१४ मधील
## निशाण क्र. ११० खालील आदेश
## CNR No.- MHRT0500007712014

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ७ व १४ यांच्याविरूध्द झालेला दावा अवसानचा (अबेटमेंट सेड असाईड) आदेश रद्द करून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. ७ रघुनाथ गणपत कदम हे दिनांक ०२.०१.२०२१ रोजी वृधापकाळामुळे मयत झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १४ रविंद्र धोंडू कदम हे दि.०१.०५.२०२१ रोजी कोविड या रोगामुळे मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र.७ व १४ यांचेबाबत वेळेतच तजवीज करून त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र.७ व १४ यांचे वारसांना कायद्याचे अज्ञान असल्यामुळे अभिलेखावर आणणे राहून गेले. मयत प्रतिवादी क्र.७ व १४ यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर न घेतल्याने सदरचा दावा अबेट झाला आहे. प्रतिवादी क्र.७ व १४ यांचेविरुध्द झालेला दावा अवसानचा आदेश रद्द न झाल्यास वादी यांचे पैशाचे स्वरुपात कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादी यांनी सदरचा अर्ज दावा अवसान आदेश रद्द करणेकरीता दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज बेकायदा व मुदतबाह्य आहे, १० वर्षे दावा पडून आहे. तरी अर्ज खर्चासह फेटाळयात यावा असे म्हणणे दाखल केले आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे सन्मानिय विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, प्रकरणाचा अभिलेख पाहिला, प्रस्तुत अर्जाचे नैसिर्गिक निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील माझे कारणासहीत निष्कर्ष नमुद केले आहेत ते खालीलप्रमाणे–

| अ.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जातील मागणीप्रमाणे मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांच्याविरूध्द दावा अवसान झालेचा आदेश रद्द होवून मिळणेस प्रस्तुत वादी पात्र आहे का? | होय. |
| २. | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्द क्र. १ व २</u> –**

**५.** प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा दावा मिळकतीतील अतिक्रमण काढून मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. ७ हे दि.०२.०१.२०२१ रोजी तर प्रतिवादी क्र. १४ हे दि.०१.०५.२०२१ रोजी मयत झाल्याची बाब यातील इतर प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही. वादी यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ट्यर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे तसेच अर्जासोबत मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे मृत्यु दाखल्यांच्या प्रती दाखल केल्या आहेत. प्रतिवादी क्र.७ हे दि.०२.०१.२०२१ रोजी व प्रतिवादी क्र.१४ हे दि.०१.०५.२०२१ रोजी मयत झाले असल्याने मुदतीचे कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे वारस मयत दिनांकापासुन ९० दिवसाचे आत अभिलेखावर वादीतर्फे घेणे आवश्यक होते. परंतु वादी यांनी प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे वारस विहीत मुदतीत घेतले नसलेने दावा अवसान (अबेट) पावला आहे.

**६.** दाव्याचे स्वरूप व त्यामधील वादी यांची मागणी पाहता प्रस्तुत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांच्याविरूध्द दावा अवसानचा आदेश रद्द न झालेस सदर वाद विषयाला घेवून भविष्यात वादी यांचे वारस व प्रतिवादी यांचे वारसांचे दरम्यान अनेक दावे दाखल होऊ शकतात. प्रस्तुत प्रतिवादी यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर प्रतिनिधींना दावा पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे वादी यांची प्रस्तुत दाव्याची मागणी पाहता मयत प्रतिवादींचे कायदेशीर वारसांना अभिलेखावर घेतल्यास

प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदर कायदेशीर प्रतिनिधींना याकामी अभिलेखावर न घेतल्यास वादी यांचे नुकसान होईल. दाव्याचे स्वरूप पाहता, नैसिर्गिक न्याय निर्गितीकरीता प्रतिवादी क्र. ७ व १४ यांच्याविरूध्द दावा अवसान झालेचा आदेश रद्द करून त्यांचे कायदेशीर प्रतिनिधींना याकामी अभिलेखावर घेणेची परवानगी देणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. याकारणास्तव मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज (नि.११०) मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांच्या विरूध्द दावा अवसान झालेचा (अबेट) आदेश रद्द करण्यात येतो.

**दिनांक– २२/०२/२०२४**

**सही/–**
**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

**CERTIFICATE**

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 82/2014 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Court, Khed. |
| Date of Decision | : | 22.02.2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 22.02.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 23.02.2024 |